(पहिली वेळ)

कार्यालय जि.प.लघुपाटबंधारे विभाग,वर्धा.

ई निविदा सुचना क्र-7 सन 2025-2026 — जि.प.लघुपाटबंधारे विभाग,वर्धा.

क्र.जिपव/जिजअ/लपा/लेखा/नि.नो./वशि------/2025 — दिनांक :-

दुरध्वनी क्रमांक :-07152-243291

जिल्हा जलसंधारण अधिकारी, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद ,वर्धा या कार्यालयाअंर्तगत जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन 2025-2026 या वर्षात लेखाशिर्ष 2702-6612/31 व 2702-6621/31 अंर्तगत मंजूर झालेले 6 कामाकरिता मा.अति.मु.का.अ.जि.प.वर्धा यांनी दिलेल्या मान्यतेनुसार योग्य त्या वर्गातील जिल्हा परिषद.नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन खालील अटी व शर्तीचे अधीन राहुन ई-निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | तहसिल/ जिल्हा | प्रशासकिय मान्यता किंमत | परिशिष्ट ब प्रमाणे कामाची किंमत | अनामत रक्कम (1%) | ई-निविदा फॉर्मची किंमत18% G.S.T | काम पुर्ण करण्याचा कालावधी | निविदा सादर कर्ता | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | गांव तलाव पालोती दुरुस्ती | वर्धा | Rs.2078331/- | Rs.1691714.07/- | Rs.16917/- | Rs.2360/- | 11 महिणे | सु.बे.अ. | वर्ग 5 अ व त्यावरील |
| 2 | लघुसिंचन तलाव दसोडा दुरुस्ती | समुद्रपूर | Rs.1401493/- | Rs.1158259/- | Rs.11583/- | Rs.2360/- | 11 महिणे | खुला | वर्ग 6 व त्यावरील |
| 3 | गांव तलाव चानकी (भगवा) दुरुस्ती | हिंगणघाट | Rs.1399062/- | Rs.1119646/- | Rs.11196/- | Rs.2360/- | 11 महिणे | सु.बे.अ. | वर्ग 6 व त्यावरील |
| 4 | साठवण तलाव शिरसगांव दुरुस्ती | हिंगणघाट | Rs.3264780/- | Rs.2606377/- | Rs.26064/- | Rs.2360/- | 11 महिणे | खुला | वर्ग 5 व त्यावरील |
| 5 | साठवण बंधारा भैय्यापूर दुरुस्ती | हिंगणघाट | Rs.2938221/- | Rs.2359233/- | Rs.23592/- | Rs.2360/- | 11 महिणे | खुला | वर्ग 5 अ व त्यावरील |
| 6 | साठवण बंधारा जामणी हेटी दुरुस्ती | हिंगणघाट | Rs.1087371/- | Rs.888932/- | Rs.8889/- | Rs.2360/- | 11 महिणे | सु.बे.अ. | वर्ग 6 व त्यावरील |

**(विनित आर.साबळे)**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी**
**जिल्हा परिषद लघुपाटबंधारे विभाग,वर्धा**

**(मनोज पाते )**
**मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद,वर्धा.**

**(एस.व्ही.गोहाड)**
**अति.मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,वर्धा.**

**जिल्हा जलसंधारण अधिकारी लघु पाटबंधारे विभाग , जिल्हा परिषद वर्धा यांचे कार्यालयामार्फत विविध योजने अंतर्गत कामासाठी बांधकाम विभाग जिल्हा परिषद वर्धा कडील उचित वर्गवारी नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन ई-निविदा अंतर्गत ऑनलाईन बी-1 निविदा मागविण्यात येत असल्यामुळे ऑन लाईन ई-निविदेमध्ये खालील प्रमाणे अटी व शर्ती अपलोड करणे आवश्यक आहे.**

| | |
|---|---|
| १ | **निविदा भरतांना लिफाफा क्र. १ मध्ये** निविदा धारकांने (Online Gateway) द्वारे भरणा केलेली कोरी निविदेची किंमत (Tender Fee) व इसारा रक्कम १% (EMD) याबाबतची स्कॅन/छायांकित प्रत सोबत जोडणे अति आवश्यक राहील.सु.बे.अ./ म.स.सं.यांना E.M.D.भरण्यापासून सुट राहील. |
| २ | भरलेली निविदा उघडण्याचे दिनांकापासुन ९०दिवसात विधिग्राह्य राहील.किंवा तदनंतर कंत्राटदाराने निविदा रद्द समजण्यात यावी असे लेखी स्वरुपात देईपर्यंत निविदा विधी ग्राह्य राहील. |
| ३ | निविदेद्वारे प्रस्तावित कंत्राटी कामाचा व सदर कामे पुर्ण करण्यासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या कामगारांना विमा शासकिय विमा निधीकडे किंवा शासकिय विमा निधीच्या अनुमतीने अन्य विमा कंपनीकडे विमा उतरविल्याशिवाय कंत्राटदारास कंत्राटी कामापोटी देय रक्कम प्रदान केली जाणार नाही. |
| ४ | निविदा मंजुर झाल्यानंतर सात दिवसांच्या आत महाराष्ट्र शासन मार्फत निर्गमित करण्यात आलेल्या अद्यावत नियमानुसार स्टँम्प पेपर सादर करावे लागेल. |
| ५ | जिल्हा परिषदेचे योग्य वर्गातील निविदा धारकांचे अद्यावत पंजीयन प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहिल. |
| ६ | महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांक २४७/१७ दिनांक ३०/११/२०१८ अन्वये व शासन निर्णय क्र.निविदा ०४१७ /प्र.क्र.२४७/१७ मोप्र-१ दिनांक २३/०६/२०२० अन्वये परफॉर्मन्स सेक्युरिटी घेतली जाईल यांची नोंद घेण्यात यावी. |
| | १) प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधिन कामाच्या किंमती पेक्षा १०% पर्यंत कमी दराचा असेल तर निविदाधीन कामाच्या १% परंतु कमीतकमी रुपये १०००/-(उदा.१ते१०% कमी दर साठी १%) |
| | २) प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधिन कामाच्या किंमती पेक्षा १०% पर्यत जास्त कमी दराचा असेल तर देकार १%पेक्षा जेवढा जास्त कमी दराने आहे तेवढी रक्कम अधिक वरील मुददा क्र (१) मध्ये नेमुद केल्याप्रमाणे परंतु कमीत कमी रु.१०००/- (उदा.१४%कमी असल्यास ( १% + (१४-१०) %) = ५% |
| | ३) प्राप्त निम्नतम निविदेच्या देकार निविदाधिन कामाच्या किंमतीच्या १५%पेक्षा जास्त कमी दराने असल्यास उर्वरीत रक्कमेसाठी मुद्दा क्रं.(२) प्रमाणे ६% अधिक १५% पेक्षा जेवढा कमी दराने आहे त्याच्या दोन पटटीने रक्कम परंतु कमीत कमी रुपये १०००/- (उदा. दर १९%कमी असल्यास (६%+(१९%-१५%)x२%=१४%) |
| | ४) अतिरिक्त परफॉरमन्स सेक्युरिटी ची रक्कम D.D.द्वारे जमा करणे आवश्यक राहिल. महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांक -निविदा ०४१७/(प्र.क्र.२४७/१७) मोप्र-१ दिनांक १८/१०/२०२३ परिच्छेद ५ अन्वये लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर न्युनतम देकार सादर करणाऱ्या L-१ निविदाधारकाने आठ (८) दिवसांत या कार्यालयाकडे परफॉरमन्स सेक्युरिटी जमा करावी.हि आठ दिवसांची मुदत कोणत्याही कारणास्तव शिथिलक्षम असणार नाही.उक्त मुदतीत अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम जमा न केल्यास निविदा रद्द करुन निविदाकाराची रक्कम जप्त करण्यात येईल.तसेच निविदाकारास निविदा उघडल्याचे दिनांकापासून दोन (२) वर्षासाठी या कार्यालयाचे निविदा भरण्यासाठी अपात्र घोषित करण्यात येईल.अशा परिस्थितीत सदर कामासाठी नवीन निविदा न मागविता L-२ निविदाकारास L-१ च्या दराने व त्याच अटी व शर्तीनुसार काम करण्यास तयार असेल तरच L-२ निविदाकाराची निविदा स्वीकृत करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल अन्यथा नव्याने निविदा मागविण्यात येईल. |

| | |
|---|---|
| ७ | सी.एस.आर. दराच्या १०% पेक्षा कमी दराने निविदामध्ये दर नमुद केले असल्यास कमी दराबाबत दरपृथकरण प्रत्येक कामाच्यी बाब निहाय / तांत्रिक सामुग्री असल्यास त्याचे सबंधीत तपशिलासह तसेच रु. १०० चे स्टॅम्प पेपर वर काम निकृष्ठ दर्जाचे होणार नाही / अर्धवट सौडून देणार नाही/ कामाचे मान्यता मुल्यापेक्षा जास्त रक्कमेचे काम करणार नाही/ लेखा मान्यते शिवाय परिमानात वाढ करणार नाही व इतर बाबीची दक्षता घेण्यात येईल असे हमी पत्र निविदा स्वीकृती च्या वेळी सादर करावे . अन्यथा आपली निविदा रद्द करण्यात येईल. |
| ८ | सर्व शासकिय कंत्राटदार/कंत्राटदारांनी आपले दर नमुद करतांना शासनाने दिनांक ०१/०७/२०१७ नंतर वेळोवेळी लागु केलेले कर/उपकर नमुद करावे.तसेच महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे परिपत्रक क्र.जिएसटी/प्र.क्र.८१/कराधान-१ दिनांक १९/०८/२०१७ अन्वये कर/उपकर तसेच जिएसटी बाबतची परतफेड करण्यासाठी कंत्राटदारांना कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही. |
| ९ | ऑनलाईनद्वारे ई-निविदा कोऱ्या संचाची व बयाना रक्कम मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी,जि.प.वर्धा यांचे स्टेट बँक ट्रेझरी शाखा,वर्धा येथील खाते क्र. ३२७७००४८२७७ या खाते क्रमांकावर ऑनलाईन पेंमेट जमा करणे बंधनकारक आहे. |
| १० | कार्यारंभ आदेश निर्गमित झालेल्या दिवसा पासुन १ महिन्याच्या आत काम सुरु करणे व दिलेल्या कालावधीत पुर्ण करणे बंधनकारक आहे.कुठल्याही प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. |
| ११ | पॅन कार्ड प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.आयकर विवरणपत्र मागील ३ वर्षाचे आयकर भरणा केल्याबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक राहिल. |
| १२ | जिएसटी नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे जिएसटी नोंदणी प्रमाणपत्र न जोडल्यास निविदा अप्रात्र ठरविण्यात येईल. जिएसटी शासन निर्णयाप्रमाणे कामांच्या देयकातुन कपात करण्यात येईल. |
| १३ | निधिच्या उपलब्धते नुसार कामाचे देयक अदा करण्यात येईल. |
| १४ | निविदा सादर करताना अनामत रक्कम व निविदा शुल्क यशस्वीरित्या भरण्याची जबाबदारी संबंधीत निविदा धारकाची असेल on line payment यशस्वी न झाल्यास निविदा धारकाची निविदा system ने automatic reject केल्यास ल.पा. विभाग जि.प. वर्धा जबाबदार राहणार नाही.वैध निविदा धारकाचे निविदा उघडण्यास येईल.याची सर्व कंत्राटदाराची नोंद घ्यावी. |
| १५ | कंत्राटदारास वाटप करण्यात आलेली कामे त्याच कंत्राटदाराला करावी लागेल. इतरामार्फत कामे केल्यास / आढळल्यास सबंधित कंत्राटदारास काळया यादीत समाविष्ट करण्याची व इतर नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. |
| १६ | कंत्राटदारांने सन २०२५-२६ मधील आर्थिक वर्षाचे स्टॅप पेपरवर ई-निविदेतील संपुर्ण अटी व शर्ती वाचुन पाहिल्या व त्या मला बिनशर्त मान्य असल्याबाबतचे व कोणत्याही शासकिय/निमशासकिय/खाजगी संस्थेच्या काळया यादीमध्ये समावेश नसल्याबाबतचे व निविदेतील माहिती सत्य असल्याबाबत/खोटी आढळल्यास नियमाप्रमाणे कार्यवाहीस पात्र राहील असे रुपये १००/- चे स्टॅम्प पेपरवर शपथपत्र / प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे. डी.टी.पी.मध्ये नमुना जोडण्यात आले आहे.सर्व कागतपत्रे खरी असलेबाबतचे विहित नमुन्यातील शपथपत्र कामनिहाय स्वतंत्र अपलोड करणे बंधनकारक आहे.प्रस्तुत कामांस निविदाकार लघुत्तम ठरल्यास करारनामा करतांना सदरचे अपलोड केलेले मुळ शपथपत्र (Original Affidavit) प्रत्यक्ष सादर करणे आवश्यक आहे. |
| १७ | कंत्राटदाराने निविदेसोबत दिलेली माहिती अचुक आहे. असे गृहीत धरुन करारनामा करण्यात येईल. चुकीची माहिती देवुन शासनाची दिशाभुल केली किंवा कंत्राट प्राप्त केले असे आढळुन आल्यास शासकीय नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल व सदर निविदा रदद करण्यात येईल. |
| १८ | निविदेमध्ये सहभागी निविदाधारकांने कोणत्याही टप्प्यावर निविदेतुन माघार घेतल्यास त्यांची इसारा रक्कम जप्त करण्यात येईल तसेच निविदाकारांवर नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल. |
| १९ | निविदेबाबत काही वाद उद्‌भवल्यास त्या संबंधाने निर्णय घेण्याचा अधिकार निविदा समितीचा राहिल. |
| २० | कोणतेही कारण न देता निविदा कोणत्याही टप्प्यावर अंशत: किंवा पुर्णत: रद्द करण्याचे अधिकार निविदा समिती जिल्हा परिषद,वर्धा यांना राहिल. |
| २१ | व्यवसाय कर प्रमाणपत्र सन २०२४-२०२५ चे सादर करणे आवश्यक राहिल. |
| २२ | कामाचा दोष निवारण कालावधी १ वर्ष राहिल. |

| | |
|---|---|
| २३ | रु.१५.०० लक्ष ते रु.५० लक्ष अंदाजपत्रकिय किमतीच्या कामाकरीता रु.१५ लक्षच्या मर्यादेत निविदाकारानी (Similar Type of Works) काम यशस्वीरित्या पुर्ण केलेले असले पाहिजे व रु.९० लक्षा चे वरील काम करणेकरीता रु.३० लक्षाचे वरील काम करण्याचा अनुभव आवश्यक आहे.व केलेल्या कामाचे जिल्हा जलसंधारण अधिकारी किंवा त्यावरील सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले काम पुर्णत्वाचे (Work Done Certificate) मुळ कागदपत्र स्कॅन करुन अपलोड (Upload) करणे बंधनकारक आहे. |
| २४ | रु.१५.०० लक्ष चे वरील "को.प.बंधारा" चे कामाकरीता को.प.बंधाऱ्याचा अनुभव आवश्यक राहिल. "सिमेंन्ट नाला बंधारा" चे कामाकरीता सिमेंन्ट नाला बंधाऱ्याचा अनुभव आवश्यक राहिल."साठवण बंधारा दुरुस्ती व नाला खोलीकरण कामासाठी साठवण बंधारा दुरुस्तीचा व नाला खोलीकरणाचा" अनुभव आवश्यक राहिल.नवीन बंधारा बांधकामास बंधारा बांधकामाचा अनुभव आवश्यक राहिल.तलाव दुरुस्तीच्या कामासाठी तलाव दुरुस्तीचा अनुभव आवश्यक राहिल.तलावाचे दुरुस्ती मध्ये सांडवा दुरुस्तीचे कामाकरीता सांडवा दुरुस्तीचा अनुभव आवश्यक राहिल.तसेच कालवा / कॅनल / नहर दुरुस्तीच्या कामाकरीता कालवा / कॅनल / नहर दुरुस्तीचा अनुभव आवश्यक राहिल. |
| २५ | सु.बे.अ./म.स.सं/खुला प्रवर्गातील कंत्राटदारांना १५ लक्ष खालील कामाकरीता अनुभव बाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक नाही.म.स.सं. ला जिल्हा उपनिबंधक (सहकार) किंवा जिल्हा सहकारी संघाकडून निर्गमित काम करण्याची आर्थिक पात्रता असल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहिल. |
| २६ | यंत्र सामुग्री असल्याचा तपशिल दर्शविणारे विवरण पत्र जोडणे आवश्यक आहे.रु.५०.०० लक्ष चे वरील कामास स्वमालकीची यंत्र सामुग्री असणे आवश्यक / बंधनकारक राहील.Excavator type of Machinery करीता यंत्र सामुग्री मालकाचे नावाने यंत्र सामुग्री असल्याबाबतचे R.C.Book व Current Years Insurance जोडणे आवश्यक राहिल.<br>रु.५०.०० लक्ष चे खालील कामाकरीता स्वमालकीची यंत्र सामग्री असल्यास Excavator type of Machinery करीता यंत्र सामुग्री मालकाचे नावाने यंत्र सामुग्री असल्याबाबतचे R.C.Book व Current Years Insurance जोडणे आवश्यक राहिल / भाडयाने घेतले असल्यास मुळ भाडे करारनामा (Affidavit) सध्याच्या प्रत्येक कामाकरीता स्वतंत्ररित्या निविदेसोबत जोडणे आवश्यक राहिल तसेच भाडेकरार केलेले यंत्र सामुग्री मालकाचे नावाने यंत्र सामुग्री असल्याबाबतचे R.C.Book व Current Years Insurance जोडणे आवश्यक राहिल. |
| २७ | उपरोक्त कामाची देयके VPDA प्रणाली मार्फत पारीत होणार असल्याने संबंधीत प्रणाली चे लागु असलेले सर्व कालबद्ध नियम कंत्राटदारांनी / निविदाकारांनी पाळणे आवश्यक राहिल. |
| २८ | उपरोक्त १ ते २७ मधील कोणतेही कागदपत्र अपलोड (Upload) केलेले नसल्यास वा अपुर्ण /अवैध असल्यास सदर ठेकेदाराची निविदा बाद करण्यात येईल व त्याचा व्यापारी लिफाफा उघडण्यात येणार नाही.तसेच कोणतेही कागदपत्र अपलोड (Upload) करण्यास वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.कागदपत्राच्या मुळ प्रती स्कॅन करुन अपलोड (Upload) कराव्यात. |

(विनित आर.साबळे)
जिल्हा जलसंधारण अधिकारी
जिल्हा परिषद लघुपाटबंधारे विभाग,वर्धा

(मनोज पाते)
मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी
जिल्हा परिषद,वर्धा

(एस.व्ही.गोहाड)
अति.मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,वर्धा

Signature Not Verified
Digitally signed by Ashish Arunrao Gandhe
Date: 2026.03.27 18:58:07 IST
Location: Maharashtra-MH